प्रकरण चौथे

# 'आवडी' कादंबरीतील स्त्रीविषयीचा दृष्टिकोन

# प्रकरण चौथे

# 'आवडी' या कादंबरीतील स्त्री विषयीचा दृष्टिकोन

## ०१. प्रस्तावना :

दु:खितांच्या दु:खितांना वाचा फोडण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांच्या १९५१ साली लिहिलेल्या पहिल्या कादंबरीपासून त्यांच्या कादंबरी वाङ्मयाचा प्रवास सुरु झाला. हा प्रवासच एक विशिष्ट ध्येय ठेवून सुरु करण्यात आला होता. वैयक्तिक जीवनात अनेक वादळवाऱ्यांशी लढून जीवनात उभे राहण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या व स्वत:बरोबरच आपल्या इतर बांधवांनाही या वादळाशी सामना करण्याचे सामर्थ्य देणाऱ्या अण्णाभाऊंच्या नसानसांत त्यांच्या लहानपणापासूनच सदैव अन्यायाबद्दलची चीड जागी राहिली. यामुळेच त्यांना जिथे कुठे अन्याय दिसला तिथे ते पेटून उठले व आपल्या व्यक्तिरेखांमध्येही तो संताप रुजविला.यातूनच त्यांनी आपल्या कांदबरी लेखनाच्या प्रवासात ज्या काही कादंबऱ्या लिहिल्या त्यातील काही नायकप्रधान तर काही 'स्त्री' केंद्र मानून लिहिल्या. समाजात रुजलेला 'स्त्री-पुरुष' भेदभावही त्यांना या माध्यमातून निपटून काढायचा होता. अशा या स्त्री केंद्रित कादंबरीचा वेगळा अभ्यास करताना त्यामध्येही आशय, विषयात नावीन्य आढळले.

तमाशाकलावंत स्त्रीची दु:खे, कामगार स्त्रीची व्यथा यांना अनुलक्षून लिहिलेल्या 'वैजयंता' व 'चंदन' या कादंबरीतून अवतरलेल्या स्त्री विश्वाच्या अभ्यासानंतर उच्चवर्णीय समाजातही स्त्रीच्या भावविश्वाला अजिबात स्थान नसल्यामुळे तिची होणारी घुसमट ही सुद्धा एक स्त्री समस्या म्हणूनच अण्णाभाऊंनी मांडली. ही समस्या मांडणारी अण्णाभाऊंची 'आवडी' ही कादंबरी व त्यातून व्यक्त झालेला अण्णाभाऊंचा स्त्री विषयीचा दृष्टिकोन हा या प्रकरणाचा अभ्यास विषय आहे. या अभ्यासाची दिशा ठरवत असताना ग्रामीण भागातील स्त्रीजीवन, कादंबरीच्या कथानकामधून स्पष्ट करत असताना परंपरेला छेद देणारी आवडी, तिच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष संवादाच्या, घटना-प्रसंगाच्या मदतीने मांडून विवेचन करण्याचे प्रयोजन आहे.

## ०२. 'आवडी'च्या निर्मितीची प्रेरणा :

स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसुत्रीवर आधारित अण्णाभाऊंची विचारसरणी स्त्रीचे स्वातंत्र्य, तिला पुरुषांच्या बरोबरीने समता व समाजामध्ये आदरभाव देण्यासाठी प्रयत्न करते. अशी जनतेची कदर करणारा, लोकभक्तीने भारलेली लेखणी घेऊन या सारस्वताच्या मंदिरात अण्णाभाऊंच्या रुपाने आला होता. वर्ग-वर्ण-जाती - स्त्री - पुरुष अशा सर्व भेदावर त्यांनी आपल्या लेखणीने

निकराचे हल्ले चढविले आणि सर्व प्रकारच्या शोषणाला आपल्या परीने विरोध दर्शविला. अशा या एकांड्या लेखकाने एकलव्याप्रमाणेच स्वत:वरच निष्ठा ठेवून अतिशय प्रामाणिकपणे, पाहिलेल्या, अनुभवलेल्या व जगलेल्या अनेक पात्रांना जन्म दिला. ही पात्रे त्यांच्या स्वत:च्या अनुभव विश्वातली, जवळची होती. तशीच ही 'आवडी' ही त्यांनी पाहिली होती म्हणूनच ती शब्दरुप धारण करु शकली.

अण्णाभाऊंनी आपल्या अनुभवातील पात्रांकडे अतिशय आपुलकीने पाहिले कारण ज्या प्रखर वास्तवात ते स्वत: घडले तशाच प्रखर पार्श्वभूमीतून त्यांची ही पात्रे आकाराला आली होती. त्यांचे जीवन म्हणजे अनुभवांची एक व्यापक कार्यशाळाच होती. या कार्यशाळेत कल्पनेच्या भराऱ्यांना स्थान नव्हते कारण, कल्पनेचे पंख लावून भरारी घेते ते स्वप्नरंजन. या स्वप्नरंजनाला अण्णाभाऊंचे वास्तव जीवन पेलविणारे नव्हते म्हणूनच त्यांनी वास्तव चित्रणाची वाट चोखाळली व आपल्या प्रतिभेने त्या वास्तवाला आकार दिला. याबाबतीत अण्णाभाऊंनी स्वत:च 'आवडी' या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत कबुली दिली आहे. ते म्हणतात, ''मी जे जीवन जगलो, जगत आहे नि जे मी अनुभवलं आहे, तेच मी लिहितो. वास्तवतेला फाजील महत्त्व देणारा म्हणून काही मित्र रागावतात पण, वास्तवता नि कल्पकता यांचा मेळ कसा घालावा हा एकच प्रश्न माझ्यापुढे उभा असतो. माझी माणसं मला कुठं ना कुठं भेटलेली असतात. त्यांचं जगणं, मरणं मला ठाऊक असतं. या 'आवडी'चे प्रेत गोरीतून काढले, तेव्हा मी गोरीजवळ हजर होतो. प्रचंड देहाचा धनाजी काखेत लुगडे-चोळी घेऊन रडत होता. त्याला आवडीची एक चेपली मिळाली, तेव्हा तो लहान मुलाप्रमाणे रडू लागला. त्या प्रसंगाचा माझ्या मनावर खोल परिणाम होऊन 'आवडी'चं जीवन माझ्या प्रतिभेत एकरूप झालं. तब्बल चार वर्षे मी विचार केला. सर्व पदर हाती आल्यानंतरच मी ही 'आवडी' निर्माण केली.''[१]

या विस्तृत आणि प्रामाणिक भूमिकेमुळेच त्यांच्या या माणसांचं जगणं-मरणं त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचा विषय होऊ शकले. 'आवडी'चे जगणे आणि मरणेही अण्णाभाऊंनी याची देही याची डोळा पाहिले, अनुभवले होते. त्यामुळे कल्पनेचा आधार घेऊन त्यांच्या जीवनमृत्यूचे चित्रण करण्याची आवश्यकता अण्णाभाऊंना कधी भासली नाही. त्यांच्याकडे अशा अनुभवांचा खूप मोठा साठा होता. तेच अनुभवाचे कोठार त्यांनी मराठी सारस्वतासाठी उधळले. अशा या आपल्या माणसांचे सुख-दु:ख जाणणारा त्याला मूर्त स्वरुप देणारा हा लोककलावंत म्हणूनच विरळाच वाटतो. 'आवर्ड' च्या माध्यमातून मातीखाली दडलेले वास्तव अण्णांनी लोकांच्या समोर आणले

व तिच्या जीवन चित्रणाच्या माध्यमातून ग्रामीण उच्चवर्णीय, श्रीमंत कुटुंबातील स्त्रीजीवन उजेडात आले.

**०३. ग्रामीण कुटुंबातील स्त्रीजीवन :**

'आवडी' या कादंबरीतून घरंदाज, श्रीमंत ग्रामीण कुटुंबातील सुंदर तरुणीने पाहिलेल्या स्वत:च्या जीवनातील स्वप्नांना त्या कुटुंबातील कर्त्या पुरुषांचे सरंजामशाही प्रवृत्तीचे मन कशाप्रकारे उध्वस्त करते याचे हृदयस्पर्शी दर्शन घडविले आहे. ग्रामीण भागात मुलींच्या स्वत:च्या भावविश्वाला अजिबात स्थान नसते. त्यामुळे घरातील प्रमुख पुरुष मंडळींच्या म्हणण्याप्रमाणेच त्यांना जगावे लागते. त्यातूनच काही स्त्रिया या बंडखोर होतात. काही बेबंदही होतात. या बेबंद होणाऱ्या स्त्रियांमध्ये 'हौशी'ही स्त्री येते. तिला बघुन पाडळीतले लोक खुळे झाले होते पण ती कोणाकडेही डोळे वरुन करुनही बघत नव्हती. पण अचानक एक दिवस लख्या बारापटेला नदीवर आंघोळ करताना पाहताच रात्री त्याचा मळाच गाठते. तिला त्याचे वेडच लागते. हौशीला नवरा असूनही ती व्यभिचारी बनते. तिचा नवरा जगू जगदाळेला हे कळाल्यामुळेच तो तिचं नाक कापून तिचं सौंदर्य नष्ट करण्याचा प्रयत्न करतो आणि त्यामुळेच लख्या बारापटे त्याचा खून करतो व तुरुंगात जातो.

ग्रामीण भागात पुरुष स्त्रियांवर हुकूमशाही गाजविण्याचा प्रयत्न करतात. या स्त्रिया सुंदर असल्यामुळे इतर पुरुषही आपोआपच त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहतात. त्यामुळे खून, मारामाऱ्याही घडून येतात. केवळ संशयामधूनही जिवाभावाचा, रक्ताच्या नात्याचा भाऊ बहिणीचा खून करताना दिसून येतो. ग्रामीण भागात घराणं, त्याची अब्रू हे जपणंही स्त्रीच्याच हातात असल्याची मानसिकता ग्रामीण कुटुंबात अधिक असते. त्या घराण्याच्या अब्रूला जपण्यासाठी अनेक मुलींचे बळीही जातात. अशीच बळी गेलेली स्त्री म्हणजे 'आवडी' होय. स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व निर्माण करु पाहणाऱ्या स्त्रीयांची ग्रामीण भागात हेटाळणी केली जाते. तिला केवळ शोभेची बाहुली, सुंदर निर्जिव मूर्ती बनविण्याचा अट्टाहास ग्रामीण भागातील स्त्रियांविषयी पहायला मिळतो. यातूनच 'आवडी' सारखी सौंदर्याने परिपूर्ण अशी मुलगी तिचा पाय घसरेल व आपल्या घराण्याची अब्रू, इज्जत धुळीस मिळेल या संशयाने तिचा भाऊ तिचे लग्न गडबडीने एका बड्या घरातील, फेफरे येणाऱ्या मुलाबरोबर ठरवून मोकळा होतो व जबाबदारीतून मुक्त झाल्याचा आव आणतो. एक भाऊ, आवडी-आपली बहिण - तिचे जीवन केवळ स्त्रीची उपेक्षाच करायची या उद्देशाने उध्वस्त करतो व शेवटी स्वत:च बरबाद होतो. ग्रामीण भागातील स्त्रियांना घराण्याच्या नावासाठी सारे अन्याय सोसून गप्प रहावे लागते. जरब, धमकी, गुरकणे, यामुळे ग्रामीण वातावरण सतत खळबळत राहते.

याचाच फायदा नागूने घेतला होता व आपली बहिण सारजालाही या कटकारस्थानात मदतीला घेतलेले होते. त्यामुळेच सारजालाही नागूप्रमाणेच शिक्षा झाली होती. शिक्षा भोगून आल्यामुळे व आपल्या बहिणीला मारणारी, खुनी म्हणून तिच्या मालकानंही तिला घरात घेतले नव्हते. नागोजीच्या या क्रूरकर्मामुळे तात्याबा चौगुल्याच्या घरातल्या कळत्या पोरीही घाबरल्या होत्या. असे हे स्त्रीजग जिला घरातल्या सख्ख्या भावाचीही दहशत बसते. अशी एक साधी स्त्री कुठल्याही सामान्य कुटुंबात आढळून येते. या स्त्रीला नशिबी येईल ते सर्व पदरात गोड मानून घ्यावेच लागते.

"भांडं बदलता येतं, पण नवरा बदलता येत न्हाय आणि मुलीचा जन्म निराळा असतो. तिला दिल्या घरी, न्हाय तर व्याल्या घरीच मेलं पाहिजे तिला मरण्यासाठी तिसरी जागाच नसती." (पृ. क्र. ४६-४७)

या तात्याबा चौगुल्याच्या उद्‌गारांवरुन ग्रामीण कुटुंबातील स्त्रीजीवन, स्त्रीला असलेली किंमत हे सर्व चित्र प्रकर्षाने समोर येते. आपल्या मुलीच्या आयुष्याची संपूर्ण होळी झाली तरी तात्याबा चौगुल्यासारखे असे अनेक वडिल आपल्याला असे दिसतात की जे आपल्याच मुलीला 'धीर धर' असा सल्ला देतात. यामध्ये या स्त्रियांचा कोणताही गुन्हा नसतानाही त्यांना हे सर्व सहन करावेच लागते. तेव्हाही नागूसारखे भाऊ, "तुझ्या सुखापेक्षाही तुझ्या घराण्याची अब्रू फार, मोठी आहे. तिचा विचार कर नि नांद." (पृ. क्र.४७) असे म्हणून त्या बहिणीकडे पाठ फिरवितात व तिला संसाराच्या आगीत पुन्हा लोटून देतात. आणि जर कोणती स्त्री बंड करुन उठलीच तर 'तिने घराण्याला कलंकित केले' म्हणून कुत्र्याच्या मौतीनं मारायलाही ही पुरुषी व्यवस्था कमी करत नाही. एखाद्या मुलीचे लग्न झाल्यानंतर तिचा झालेला नवरा मुलगा तिला संसारसुख देऊ शकत नसला तरी तिने त्या नवऱ्याला 'देव' मानून देव्हाऱ्यात पुजलेच पाहिजे व त्याची दासी म्हणून सेवा केलीच पाहिजे. असा या पुरुषी व्यवस्थेचा आग्रह स्त्रीला सहन करावा लागतो. असे असूनही एखाद्या उच्च जातीतील स्त्रीने आपल्याला सुखी ठेवणारा पण खालच्या जातीतील मुलगा नवरा म्हणून निवडला तर तिला 'आवडी' प्रमाणे क्रूरपणे मृत्यूच्याच तोंडी दिले जाते. सख्खा भाऊ सूडाने पेटून अखेर दगाबाजीने तिचा खून करतो. "बहिणभावाचं नातं रेशमासारखं मऊ आणि कापरासारखं नाजूक असतं." (पृ. क्र. १५)

याही नात्याची क्रूरकर्मा भाऊ कदर करत नाही व नाहक आपल्या बहिणीचा बळी देतो. सख्ख्या बहिणीची भानगड करुन तुरुंगात गेलेला म्हणून त्याला कोणीच जवळ करत नाही. तात्याबाही त्याच्या कर्माचा पाढा वाचताना वैतागून म्हणतो, " या घराचं, या गावाचं, या खोऱ्याचं, साऱ्या गणागोताचं, साऱ्या आलम दुनियेचं हेच म्हणणं, की तू गैर वागलास !" ( पृ. क्र.२१)

ग्रामीण भागात रस्त्यात अडवून एखाद्या स्त्रीशी बोलत उभे राहणे हे ही गैर मानले जाते. आणि त्यात जर थोराच्या लेकीनं अशा हलक्या जातीच्या माणसांशी बोलणं म्हणजे घराच्या इज्जतीचाच प्रश्न असतो. मुलीला ग्रामीण भागात 'नासका किराणा' म्हणून हिणवलेही जाते. तिला सहजपणे फसविताही येते असा पूर्वग्रहदुषित दृष्टिकोनही या लोकांमध्ये पहायला मिळतो.

'जन्मली कन्या कुळाबाहेर.' हा पारंपरिक विचार ग्रामीण भागात पहायला मिळतो. सामान्यत: महाराष्ट्रातल्या मुलींच्या वडिलांची मुलीविषयीची पलायनवादी, जबाबदारी टाळणारी वृत्ती दिसून येते. पारंपरिक विचाराने घराण्याला कलंकित करणाऱ्या स्त्रीचा खून करणारा नागूजी नायक ठरतो. त्याच नागोजीला अण्णाभाऊंनी खलनायकाच्या भूमिकेत 'आवडी' मधून आणले. ग्रामीण भागातील स्त्रियांना अशा अनेक खलनायकांना कुटुंबामधूनच तोंड द्यावे लागते.

गावागावांच्या, घराण्यांच्या आपसातील वैराच्या या कहाणीमध्ये कधी प्रतिष्ठेसाठी तर कधी अब्रुसाठी स्त्रीलाच कारणीभूत मानले जाते. त्यातूनच संघर्षांना, नाट्यमय घटनांना सुरुवात होते.

आवडीला फसवून नांदगावला गेल्यानंतर सारजा तिला सासऱ्याला नैवेद्य दाखविण्याच्या निमित्ताने आंब्याखाली रानात घेऊन जाते आणि त्याच आंब्याखाली नागू येणार असतो. आवडी, सारजा तिथं पोहोचल्याबरोबर सारजा आवडीला त्याच्या ताब्यात देते. तेव्हा सारजा तिला म्हणते, "माहेरच्या नावाला डांबर फासणाऱ्या दुष्टे, हेच तुझं पाप हाय. आता भोग।" नागूही म्हणतो, "घराण्याच्या नावाला अशी काडी लावलीस ?"( पृ. क्र.७८-७९)

पुढे आवडीची बहिणही तशीच सुंदर, आपल्या भावावर अतिशय प्रेम करणारी असते. तीही तात्याबाचा विरोध असताना नागूला भाकरी पोहचवत असते. त्यामुळेच संतापून सुभद्राला तात्याबाने चाबकाने चोपून काढले. बय्याबाईलाही दोन फटके दिले. असाच नागू आवडीप्रमाणं तुझाही खून करील असेही तो तिला सांगतो.

एकूणच आवडी कादंबरीच्या अनुषंगाने पाहिलेले हे ग्रामीण स्त्रीजीवन सर्वरंगी सर्वढंगी वाटते. कारण यात, ग्रामीण जीवन व्यवहारात येणारी प्रत्येक गोष्ट आहे. यातील स्त्री मुलगी होऊन आपल्या आई-वडिलांवर, घरावर प्रेम करणारी आहे. भावाची आरती ओवाळणारी आहे. तसेच हौशीसारखी स्वत:च्या घरावर तुळशीपत्र ठेवून दुसऱ्याच पुरुषाबरोबर पळून जाणारी, परागंदा स्त्रीही आहे. याच कादंबरीत लग्न होऊन जाणाऱ्या व येणाऱ्याही स्त्रिया आहेत. ज्या गौरीच्या सणाला येऊन माहेराची महतीही गातात. त्याचवेळी भूतकाळात रमणाऱ्या व 'गेले ते दिवस' म्हणत हळहळणाऱ्या म्हाताऱ्या बायाही आहेत. येथेच आवडीसारखी स्वत:चा अपमान सहन न

करणारी व प्रेमासाठी स्वत:च्या मनाप्रमाणे जगता यावे म्हणून कमजातीतील धनाजीला जवळ करणारीही स्त्री आहे. त्याचवेळी सारजा सारखी बहिणीला फसवून तिचा भावाकडून खून घडवून आणण्यास मदत करणारीही स्त्री आहे. तसेच आपला भाऊ खुनी असतानाही त्याच्याकडे डोळेझाक करुन त्याला जगवणारी बहिण सुभद्रासारखी स्त्रीही आपणाला भेटते. बयाबाई सारखी गुन्हेगार मुलाबाळासाठी अश्रू ढाळणारी आई येथे दिसते. आपल्या प्रीतीच्या फूलाला सोडून जाताच त्याच्यासाठी तळमळणारी, मुलाच्या आठवणीने व्याकूळ होणारी व आपला धनाजी आपल्याला उद्या न्यायला येणार म्हणून अपार आशेने वाटेकडे डोळे लावून बसणारी आवडी आपणाला इथे दिसते. आपल्या माहेरची वाट पुन्हा सुकर व्हावी म्हणून, पाखराकडे निरोप पाठविणारी आवडीही पहायला मिळते.

असे हे ग्रामीण कुटुंबातील, ग्रामीण वातावरणातील स्त्री-जीवन 'आवडी' या कादंबरीतून अण्णा भाऊ साठे यांनी रेखांकित केले आहे.

## ०४. 'आवडी' कादंबरीचे कथानक :

स्त्री-प्रश्नाला अधोरेखित करणारी कादंबरी 'आवडी' या कादंबरीची नायिका आवडी. आपले वडिल तांदळवाडीचे कर्तबगार शेतकरी तात्याबा चौगुला यांच्याबरोबर बहिण सारजा, सुभद्रा व भाऊ नागू व अप्पा यांच्यासह सुखाने रहात होती. थोरली बहिण सारजाचे लग्न होऊन तिला नांदगावात दिली होती. आवडीचा भाऊ नागू हा त्या पंचक्रोशीतला प्रसिद्ध पैलवान म्हणून गाजत होता. अशा या सुखी कुटुंबात राहून आवडी वाढत होती, शिकत होती. आपल्या भावाबरोबर कधीमधी तीही यात्रेला अप्पाबरोबर जात होती. बोरगावचा धनाजी रामोशीही त्या गावातला तरुण रामोशी. तो एक चांगल्यापैकी नागूपेक्षा थोडा खालच्या वयाचा उदयोन्मुख पैलवान होता. धनाजी तसा नम्र म्हणूनच मोठा पैलवान म्हणून आदराने तांदुळवाडीच्या यात्रेदिवशी स्वत:हून नागूला भेटायला येतो. पण नागू आपल्या मित्रांच्या गप्पांच्या रंगात त्याची खबरच घेत नाही. तेव्हा धनाजी मनातून निराश होतो व निघून जातो. ही आवडीच्या घरात झालेली आवडी व धनाजीची पहिली भेट व ओळख असते. आजपर्यंत तिने अनेक पैलवान पाहिलेले असतात. परंतु त्यातही धनाजीचा थाट काही निराळाच होता. म्हणूनच पुन्हापुन्हा ती त्याच्याकडे त्यावेळी पाहते. पुढे नाथाच्या यात्रेत आवडी व धनाजीची पुन्हा भेट होते. त्या भेटीत कोण कोण आले आहे ? अशा काही जुजबी प्राथमिक प्रश्न उत्तरातच ती भेट संपते. तांदुळवाडीच्या जत्रेत पाहिलेल्या धनाजीचे तात्याबा चौगुलाही कौतुक करतो व तांदुळवाडी त्यानं दणाणून सोडल्याचे सांगतो तेव्हापासूनच नागूच्या

मनात त्याच्याबद्दल अढी असतेच. पण, दुसऱ्या भेटीनंतर आवडीच्या मनातील धनाजीची मूर्ती जास्त ठाशीव, रेखीव, कोरीव होते. याच दिवशी मैदानात धनाजीच्या मनात नसतानाही आपण होऊन नागूच धनाजीबरोबर कुस्ती धरतो व हरतो. त्यामुळे तो जास्तच चिडीला पडतो. धनाजीच्या व आवडीच्या यात्रेतील भेटीबद्दल जेव्हा अप्पाकडून त्याला कळते तेव्हा आवडीबद्दल शंका घेऊन तिचे ताबडतोब लग्न केले पाहिजे, असे ठरवून तो मुले शोधायला सुरुवात करतो. आवडीला बरीच मोठी-मोठी घरं सांगून येतात पण तात्याबा चौगुल्याच्या हुंडा न देण्याच्या हट्टामुळे ती माघारी जातात. त्यातच बोरगावचे भगवानराव पाटील मोठी आसामी, घरंदाज श्रीमंत, कर्तृत्वसंपन्न, आपला मुलगा उत्तम याच्यासाठी आवडीला ते मागणी घालतात. घाईनेच आवडीचे लग्न उरकले जाते. आवडी नांदायला जाते आणि पहिल्याच दिवशी उत्तमला फेफरे येते. या फेफऱ्याच्या झटक्यात तो जे हाती लागेल त्याचा चुराडा करत असतो. हे समजल्यावर आवडी दु:खसागरात बुडून जाते व आपल्या भावाने नागूने त्याला सर्व काही माहित असूनही आपल्या गळ्यात हा उत्तम त्याने बांधला. हे जेव्हा तिच्या लक्षात येते तेव्हा निर्भान होते. ''आवडीला डोकीत दगड घातल्यासारखं झालं. ती तोंडात पदराचा बोळा कोंबून रडू लागली.'' (पृ. क्र. ४४)

सख्खा भाऊच वैरी झाल्याचे पाहून तिच्या आत्म्याने टाहो फोडला. नंतर काही दिवस तसेच जातात व एक दिवस तिच्याच घरी आलेला धनाजी तिला दृष्टिस पडतो व ती त्याच्या भेटीसाठी रोजच आतूर होते. तेव्हाच बोरगावच्या यात्रेदिवशी रस्त्यात तिची व धनाजीची भेट होते तेव्हाही कसं काय बरं चाललय का ? या त्याच्या प्रश्नाला ती 'नाही' असे खरे उत्तर देते व त्याचे कारण नंतर सांगेन असे म्हणते. असेच एक दिवस उत्तमचे जेवण घेऊन मळ्याला जात असताना शेवरीत तिची व धनाजीची भेट होते. तेथे त्याला सर्व घडलेला प्रसंग सांगून त्याला म्हणते, 'मला तुमच्यासारखं जगायचं आहे.' नंतर दोन-तीन भेटीत निर्णय पक्का करुन भगवान पाटलांची सून आवडी निर्धारानं धनाजी रामोश्याचे घर जवळ करते. साऱ्या गावात चर्चा सुरु होते, ''आता, ईच्याईला ! ही आवडी रामुश्याचं घर का शिरली !'' (पृ. क्र. ५३) असं म्हणून प्रत्येक माणूस कपाळावर हाणून घेऊ लागला.

शेवटी घराण्याच्या इभ्रतीसाठी भगवान पाटील गावपंचायत बोलावतो पण तेथेही उलटसुलट चर्चा होऊन धनाजीला 'आवडीला तुझ्या घरातून हाकून दे' असे सांगितले जाते. पण धनाजी आवडीला दुर्जन करत नाही तो तिला उघड्यावर टाकत नाही. पुढं तशाच खुनाखुनीच्या वातावरणात दोघांचा सुखाचा संसार सुरु होतो. आवडीला दिवस जातात. त्यातच तिला सारखी माहेरची

आठवण होऊ लागते. भगवान पाटील व नागू चौगुला तिची घरातून बाहेर पडण्याची वाटच बघत असतात, संधी शोधत असतात. तेव्हाच अचानक नांदगावची सारजा आवडीला गोड बोलून माहेरची भुरळ घालून दोन दिवसासाठी गौरीचा सण जेवायला म्हणून घेऊन जाते आणि नागू व सारजा दोघे मिळून रानात नेऊन आवडीचा खून करतात. धनाजीला हा कट कळताच तो बेभान होतो व त्या गुन्ह्यात सारजाला आठ वर्षे व नागूला चौदा वर्षांची सक्तमजुरी होते. धनाजीला वेड लागते. आवडीच्या खुनाचा बदला घेतल्याशिवाय आपण काय मरायचं नाही अशी प्रतिज्ञा करुन तो नागूची वाट पहात राहतो. शेवटी चौदा वर्षांनी नागू तुरुंगातून बाहेर पडताच त्याचा पाठलाग करुन धनाजी त्याचा खून करतो आणि आवडीच्या खुनाचा सूड घेतो. आवडी जाते, नागूही मरतो, धनाजी जातो पण 'आवडी' म्हणून मारलेली हाक मात्र त्या खोऱ्यात अमर होते आणि लोक म्हणू लागतात, "आवडी मेली, पण नाव करुन गेली. धन्य ती आवडी।" (पृ. क्र. १०७).

असा हा मृत आवडीला अमरत्व देणारा कादंबरीचा शेवट अण्णाभाऊ करतात. क्रांतीकारी आवडीला स्वत:ची उपेक्षा सहन न होऊन तिने उचललेल्या बंड करण्याच्या पाऊलामुळे पुढे एक जे वादळ उठते ते वादळ आवडीलाच गिळंकृत करते. असे हे या कादंबरीचे कथानक निश्चितच 'आवडी' या स्त्रीच्या दु:खाचेही आश्चर्य वाटायला लावते आणि वाचकाच्या पोलादी मनालाही पाझर फुटतो.

## ०५. परंपरेला छेद देणारी आवडी :

परंपरेपेक्षा स्वत:च्या जीवनाला अधिक महत्त्व देऊन उपेक्षेविरुद्ध बंड करुन उठणारी 'आवडी' कोणत्याही परिस्थितीत स्वत:ची उपेक्षा सहन करत नाही. तिने पाहिलेल्या स्वप्नांना उध्वस्त होताना पाहिल्यानंतर ती बंड करते, त्या विरोधात पेटून उठते व आपल्या मनाप्रमाणे जगण्याचा निश्चय करते आणि तशी ती कोणालाही न जुमानता लग्न न करताच धनाजी रामोश्याबरोबर सुखाचा संसार थाटते. हे क्रांतीकारी पाऊल उचलताना तिने घराण्याचा, अब्रूचा, इज्जतीचा, जातीधर्माचा कोणताच विचार केलेला नसतो. ती केवळ स्वत:च्या सुखासाठी स्वत:च लढले पाहिजे ह्या आंतरिक शक्तीने धाडसी निर्णय घेऊन त्या बरहुकूम वागते. आपल्याला फसवून आपला केसानं गळा कापल्याचे कळेपर्यंत ती पारंपरिक स्त्री जीवनाला तडा जाण्यासारखे कोणतेही पाऊल उचलत नाही पण जेव्हा तिला आपली फसवणूक झाल्याचे कळते तेव्हा मात्र ती आपल्या सासूवरच थेट तोफ डागते आणि म्हणते, "मला काय मिळालं, असं किती दिवस मी सावध राहू? दौलतीसाठी, ढोरागुरांसाठी, पोलिस पाटिलकीसाठी मी जन्मभर जीव मुठीत घेऊन किती रात्री सावध राहू ? मी का जनावर आहे? मला तुम्ही का म्हणून फसवलं ?" (पृ. क्र. ४४)

इथली माणसं वाणानं माणसं असली तरी गुणानं ती राक्षस असल्याचे समजते व ती अगतिक होते. काही दिवस असेच सर्व सहन करत राहते. माहेरी जाताना भावाला नागूलाही ती जाब विचारायला कमी करत नाही आणि माहेरी गेल्यावर आईवडिलांना सर्व काही सांगते. तेव्हाही वडिलांची व भावाची सारवासारव बघून आवडी वैतागून त्याला म्हणते, ''तू आपल्या हातानं माझ्या आयुष्याला चूड लावलीस ! देव तुझ्या घराण्याला काडी लावील !'' (पृ. क्र.४७)

आवडी माहेरहून पुन्हा बोरगावला येते. तिचं मन पेटत, कुढत, रडत होतं तरी ती नांदत होती. नंतर मात्र धनाजी याच गावचा असून तो सनदशीर शिपाई असल्याचे कळताच आवडीला आनंद होतो. ती त्याला पाहून लाजत होती. नाथाच्या जत्रेत भेटला तसा एकदा धनाजी भेटावा म्हणून ती देवाला नवस करत होती. अचानकच बोरगावच्या यात्रेत धनाजीची भेट होते. आवडीला त्याचं वेडच लागलं. हळूहळू तिचे मन नवे रुप घेऊ लागले होते. त्याच्या भेटीसाठी आतूरतेने वाट बघत होती. तशातच अचानक भेट होऊन ती धनाजीला जवळ करण्याचा निश्चय करते. निश्चयाप्रमाणे वागते आणि परंपरेला छेद देते. धनाजीची 'मला तू नि पत्रावळ दोन्ही हवं।' ही इच्छा पाहून त्याचा तो निर्धार पाहून ती दिपली होती. त्याचंच खरं असल्याचे ती म्हणता होती. ''त्याला माझी पूर्णपणे मालकीच हवी आहे, तर ती मी का देऊ नये ? ती मी देणार. मग त्यात काय होईल, ते होवो.'' ( पृ. क्र. ५३)

अशी कोणत्याही परिणामांची तमा न बाळगणारी 'आवडी' स्वत:च्या स्वत्वाला जपणारी आहे. जबरदस्तीने लादलेल्या जीवनाला, केवळ परंपरा म्हणून आयुष्यभर त्याचे ओझे वाहण्यास नकार देऊन जीवनाला अधिक महत्त्व देते. पारंपरिक समाजव्यवस्थेतील पुरुषप्रधान संस्कृतीने तिच्या जीवनाला मर्यादेची वर्तुळे घालून बंदिस्त करुन घातलेले असते. त्यात पूर्ण जखडून जाण्याचा धोका लक्षात येताच स्त्रीस्वातंत्र्याचा हक्क मिळविण्यासाठी परंपरेने पायात अडकवलेले साखळदंड झुगारुन आयुष्यच पणाला लावते, पण जबरदस्तीचे जीवन जगणे अमान्य करते. अशा या प्रतिकूल परिस्थितीत अडकलेल्या आवडीपुढे धनाजीच्या रुपाने नव्या आशेचे जग अण्णाभाऊ निर्माण करतात. या पाठीमागे त्यांनी मुद्दाम स्वीकारलेली लेखनभूमिका महत्त्वाची वाटते कारण, अण्णाभाऊंच्या नायिकांची कहाणी दु:खांत होणे शक्य नाही. या दृष्टिने धनाजीने घेतलेला सूड विचारात घेण्यासारखा आहे. म्हणूनच अण्णाभाऊंची आवडी विशिष्ट स्त्रीरुपात बंदिस्त न राहता शाश्वत चिरंतन स्त्रीत्वाचा शोध घेणारी ठरते. धाडसी व कर्तबगार ठरते. एका बाजूने ती कर्तबगार ठरत असली तरी, तिच्या वाकड्या मार्गाने जाण्याने तिची माणसं, माहेर सर्वजण तिला आपल्यापासून

दूर करतात, अंतरतात, दुरावतात. येणाऱ्या आपल्या मुलामुळे तरी आईवडिल आपल्याला जवळ करतील अशी इच्छा व्यक्त करते. अशी ही कमजातीतल्या मुलावर प्रेम करणारी, त्याच्याकडे लग्नाशिवायच राहणारी आणि आईही होणारी आवडी खूप मोठ्या परंपरेला छेद देते. आवडीचे हे बंड अभूतपूर्व असेच आहे.

आवडीच्या या बंडाचे मूळ तिच्या माहेरच्या मंडळीकडून झालेल्या तिच्या अशा अवहेलनेत आहे. त्याचवेळी विद्रोही आवडी म्हणते, ''तूच माझ्या आयुष्याला चूड लावलिस.''(पृ.क्र.३२) म्हणूनच घराण्याला काडी लावण्याचे आवडीने वर्तविलेले भविष्य आवडी पुढे खरे करुन दाखविते आणि विद्रोहाचे गीत गाणाऱ्या अण्णाभाऊंच्या लेखणीतून निर्माण झालेली ही आवडी सुद्धा आपल्या माणसांविरुद्ध विद्रोह करते. परंपरेला छेद देणारी आवडी अखिल विश्वातील स्त्रीला पिढ्यानपिढ्याच्या गुलामीकडून - स्वातंत्र्याकडे, स्त्री-पुरुष विषमतेकडून समतेकडे, शोषणाकडून - मुक्तीकडे अशा वेगळ्या वाटांकडे नेते.

क्रांतीप्रवणता व जग बदलण्याची ईर्षा घेऊनच अण्णाभाऊ परिवर्तनाच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न करतात व भविष्यकाळाबद्दल संपूर्ण स्त्री जगाला आशादायी राहण्याचा विश्वास आवडीच्या व्यक्तिविशेषांमधून देतात. असे क्रांतीकार्य करणाऱ्या अण्णाभाऊंना म्हणूनच जनार्दन वाघमारे 'क्रांतीप्रवणतेचे कॉम्रेड' म्हणतात.[२]

अशा क्रांतीतूतनच मुक्ती मिळविणारी आवडी बंडाच्या रुपाने आपले अधिकार मिळविणारी हीचा दुर्दैवी मृत्यू होतो. तेव्हा अण्णाभाऊ लिहितात. ''आणि ती आवडी - तात्या चौगुल्याची देखणी, बंडखोर आवडी, लाडकी आवडी, तरुण आवडी क्षणात मातीला मिळाली.'' (पृ. क्र.७९)

तिचा गुन्हा एवढाच की, तिने फक्त स्वत:चा विचार केलेला असतो आणि वाकडी वाट धरलेली असते. मरणासाठी तिसरे घर निवडलेले असते. म्हणून ती वाईट ठरलेली असते. आवडीची ही बंडखोरी अण्णाभाऊंच्या केवळ लेखणीतूनच न येता ती स्वत: अण्णाभाऊंच्यामधूनच आलेली आहे. अण्णाभाऊ स्वत:ही अन्यायाविरुद्ध बंड करुन उठायचे. ती स्वत:ची बंडखोरी त्यांनी आपल्या नायिकेमध्ये पाहिली होती. म्हणूनच डॉ. एस. एस. भोसले अण्णाभाऊंना 'पहिले बंडखोर दलित साहित्यिक' असे म्हणतात.[३] अशी ही बंडखोर आवडी तिच्या या बंडखोरीमुळेच कादंबरीत उठून दिसते.

### ०६. आवडीच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू :

तात्याबा चौगुल्याची लाडकी लेक 'आवडी'. नागूजी पैलवानाची लाडकी बहिण 'आवडू', अशा नावांनी घरात सर्वांनाच आवडणारी 'आवडी' या कादंबरीची नायिका. देखणी, तरुण,

केळीच्या कोंबासारखी नाजूक होती. प्रेमळ, मनाने निर्मळ व स्वभावाने भोळी भाबडी आवडी जीवनात आलेल्या सत्याच्या अनुभवाने करारी, कणखर, बंडखोर बनते. भावावर नितांत प्रेम असणारी आवडी भावाने कुस्ती केली की आनंदून जात होती. तो जेवल्याशिवाय स्वत: न जेवणारी आवडी तिच्या रंगाला, रुपाला नि गुणाला गावात जोड नव्हती. नाकी-डोळी खुडून घ्यावी तशी आवडी तारुण्यानं मोहरली होती. तिच्या गालावरचं हसू कधीच मावळत नव्हतं. तात्याबा चौगुला तर अभिमानानं फुगून म्हणत होता, ''कुरीनं पैसा पेरीन, पण आवडीला साजंसाच नवरा शोधीन. तिळभर उणं असलेला नवरा मला परवडणार नाही.''(पृ. क्र.२४) अशी शाळा शिकलेली 'आवडी' हिच्यासारखं देखणेपण असावं असे गावात बोलले जात होते.

अशी सौंदर्याने परिपूर्ण आवडी उंच, देखण्या पिळदार शरीर, सिंहासारखी चपळाई असणाऱ्या धनाजीवर जीव टाकत होती. इतर पैलवानांपेक्षा धनाजीचा थाट काहीसा निराळाच असल्याची जाणीव त्याच्या पहिल्या भेटीतच तिला होते. वडिलांनी केलेले त्याचे वर्णन त्याप्रमाणेच तो आपल्यालाही दिसल्याचे कबूल करते. त्याची निर्मळ नजर, निर्मळ हसणं, अदबीनं बोलणं यांनी आवडीचं मन भारावून गेलं होतं. करारी, कणखर, आवडीने फसवून लग्न केल्यामुळे दौलतीच्या ढिगावर ठोकर मारुन धनाजीच्या घरी आली होती. त्यामुळे धनाजीलाही ती देवच वाटत होती. त्यामुळेच तो भगवान पाटलाच्या विरोधात जातानाही, ''मी आवडीच्या मानेवर मान तोडून घेऊन मरणार !'' (पृ. क्र. ५७) असेच म्हणत होता. धनाजीची ती नेकी, प्रीत करण्याची झुंजार रीत पाहून ती सुखावते व आपण पुन:पुन्हा जन्म घेऊन याच्या पायाशी जगावं, मरावं असे तिला वाटते. याच आवडीच्या प्रीतीला फूल येते तिला मुलगा होतो. या मुलामुळे तरी आपल्याला परत माहेर लाभेल या इच्छेने ती धनाजीकडे माहेरची आठवण काढते. तेव्हाच तिला घेऊन जाण्यास सारजा तिची बहिण येते. नांदगावला गेल्यावर मात्र सारजा आपला रंग सारखा बदलत होती आणि खोचकपणे जेव्हा ती आवडीला म्हणते, ''नवरा चांगला नव्हता, तर त्याला सोडायचा नि माहेरी जायचं. एखाद्या कमजातीच्या माणसाचं घर शिरुन काय मिळवलंस ? आई-बाप, घर, घराणं ह्यांचा इचार केलास का ?'' तेव्हा चटकन आवडीही म्हणते, ''जे घर मी शिरले, ते घर आता माझं घर आहे. तिथं माझा आत्मा आहे. ते घर तुला वाईट दिसलं तरी ते माझं देऊळ आहे नि तिथं माझा देव आहे. त्याला बोललेलं मला सहन होणार नाही.'' (पृ. क्र. ७५-७६).

अशी धनाजीचा अभिमान असणारी आवडी अण्णाभाऊंच्या सर्व नायिकात उठून दिसते म्हणूनच तिच्याविषयी तारा रेड्डी म्हणतात, ''चौसष्ट योगिनींमध्ये जशी सकळांमध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो। तशी ही आवडी.''[४] बालपणापासूनच तेजस्वी असणारी आवडी हीला आपली फसवणूक

व आपल्यावर झालेला अन्याय सहन होत नाही. 'मला जगायचं आहे' हाच तिचा निर्धार आहे. म्हणूनच सासर, माहेर, गणगोत, समाज, दौलत, प्रतिष्ठा, उच्चनिचता सर्वांवर लाथ मारुन ती बेडरपणे अघटित निर्णय घेते म्हणूनच ती तेजस्विनी ठरते.

'तेजस्विनी', 'मनस्विनी', 'सौदामिनी' अशा अनेक विशेषांनी गौरविली गेलेली आवडी खरोखरच स्वत:च्या 'स्व' ला अस्मितेला जपणारी आहे.

प्रेमासाठी जीव देण्याची तयारी असलेली आवडी निर्व्याज्य प्रेमाचे अप्रतिम लेणेच वाटते. धनाजीवर प्रेम करणारी आवडी त्याच्या प्रेमासाठी, भेटीसाठी सर्व प्रकारची बंधने झुगारुन, सर्व संकटांवर मात करुन, घरातल्या वडिलधाऱ्यांचा रोष पत्करुन प्रत्यक्ष जीवाचाही धोका पत्करते. म्हणूनच, आपला शेवट होणार हे लक्षात येताच डोळे झाकते आणि 'धनाजी' अशी आरोळी ठोकते. याच धनाजीने तिला मृत्यूपासून वाचविलेले असते. तिची अमर आशा, बाळावरची अपार माया, धनाजीवरची अलोट प्रीती हेच आवडीच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष पैलू आहेत. कारण ती ही याच प्रेमासाठी लढली याच प्रेमासाठी मेली होती.

आई-वडिलांवर, माहेरावर अपार माया असणारी आवडी आपणाला इथे दिसते. शेवटपर्यंत आई-वडिलांची फक्त एकदाच भेट व्हावी म्हणून ती धडपडत असते.

''राजस पाखरा, तू माझ्या माहेरी जा आणि आईला सांग जा. आई तू आपल्या आवडीसाठी लवकर ये. तिला तिचं माहेर अंतरलं आहे. जर तुम्ही कोणी नाही आला, तर तुमची ही लाडकी आवडी टाचा घासून मरेल.''(पृ. क्र.६९)

अशी ही आपल्या माहेरासाठी आईसाठी तळमळणारी आवडीही आपल्याला या कादंबरीत दिसते. हा ही तिच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा पैलूच वाटतो आहे. अण्णाभाऊंनी कर्तबगार स्त्रिया रेखाटल्या, पण ''ज्या मानवाच्या मौल्यवान हक्कापासून दूर आहेत अशांच्याच जीवनावर प्रकाशझोत टाकणे हा त्यांच्या कादंबरीलेखनाचा हेतू असल्याचे मत दत्ता पाटील व्यक्त करतात. त्याबरोबर सामान्य माणूसच त्यांच्या एकूण साहित्यलेखनाचा केंद्र असल्याचेही ते सांगतात.''[५] अशी ही आवडी आपल्या स्वभाववैशिष्ट्यांमुळे अमर होते.

## ०७. समारोप :

अशाप्रकारे, अनुभवाधिष्ठित जगाच्या विद्यापीठात संस्कारित झालेल्या अण्णा भाऊ साठे यांनी अतिशय वास्तववादी जीवनाच्या भोवती अवास्तव कल्पनावादाची भिंत उभी करण्याचा

कोणताही प्रयत्न न करता 'आवडी' ही कादंबरी निर्माण केली. त्यामुळेच 'आवडी'चे जीवनदर्शन अण्णाभाऊंनी प्रस्तुत कादंबरीत घडविले त्यात कुठेही भडकपणाचा लवलेश आढळत नसावा असे माझे मत आहे.

'आवडी' या कादंबरीच्या विविधांगी अभ्यासानंतर त्या कादंबरीच्या निर्मितीमागे मानवमुक्तीची, शोषणाच्या, उपेक्षेच्या जोखडातून मुक्तता हीच प्रेरणा दिसते. या प्रेरणेमुळेच अण्णाभाऊंची नायिका आवडी अन्यायाविरुद्ध संघर्ष करु शकते. या सर्व घटितामागे सामाजिक परिवर्तनाची व्यापक भूमिका अण्णाभाऊंनी घेतली आहे. प्रस्तुत कादंबरीतून घराणी, त्यांच्यातील वैर, जातीतील भेदाभेद, बंडखोर नायिकेचे भयानक जीवनवास्तव, वास्तव जीवनातील संघर्ष, ग्रामीण जीवनव्यवहारदर्शन, त्या भागातील सुख-दु:खे इ. चे प्रत्ययकारी वर्णन, विविध भाषिक रुपांच्या रचनेतून घडते. अण्णाभाऊंच्या या प्रस्तुत कादंबरीत स्त्रीचा स्वाभिमान, तिचा करारीपणा, तिची जगण्याची धडपड तिचे तिच्या कुटुंबावरील प्रेम याचे यथार्थ चित्रण दिसून येते. ते समाजात स्त्रीचा आदर राखतात.

अशाप्रकारे, स्त्रीचे शील, स्वाभिमान व पावित्र्य जपणारे अण्णाभाऊ हे पहिलेच लेखक असावेत असे मला वाटते. माणसावर प्रेम करणारा जनता जनार्दनाला मायबाप मानून अण्णाभाऊ या माणसांवर अविरत प्रेम करताना या ही कादंबरीतून दिसून येतात. म्हणूनच संपूर्ण कादंबरीत ते तात्याबा चौगुल्याच्या उद्‌गारातून स्वत:च जणू काही बोलत असतात. तेही आवडीला दोष न देता नागूलाच सर्वस्वी दोषी ठरवितात व तिला फसविल्यामुळेच तिने वाकडी वाट धरली असल्याचे सांगून नागूलाच तूच घराण्याला कलंकित केल्याबद्‌दल त्याचा तिरस्कार करतात. अण्णाभाऊही सतत स्त्रीची आर्त वेदना मांडीत असतात. ते सातत्याने तिचीच बाजू घेतात.

**०७. निष्कर्ष :**

१. भोळी, मोकळ्या मनाची आवडी वाचकांना भुरळ घालते. ती सरळ वृत्तीची, उदार मनाची, धाडसी कर्तबगार महिला समाजापुढे आपल्या वर्तनाने एक आव्हानच उभे करते.

२. अण्णाभाऊ कोणत्याही परिस्थितीत स्त्रीला दोषी होऊ देत नाहीत. त्यांचा गौरव करणे हा अण्णाभाऊंचा दृष्टिकोन आहे. तो प्रभावीपणे याही कादंबरीत दृग्गोचर होतो.

३. आवडी ही समाजातील धाडसी, कर्तबगार स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते आणि अन्याय सहन करणाऱ्या स्त्रियांसमोर स्वत:चा आदर्श ठेवते.

४. रणरागिणी, प्रेमदायिनी, जीवनदायिनी या विशेषांनी गौरविली गेलेली ही आवडी निश्चितच स्त्री मुक्तीचा सर्वंकश विचार घेऊनच आविष्कृत होते.

५. आवडी ही स्त्री जीवनाला आत्मविश्वास, कर्तृत्व, स्वावलंबन आणि जीवन संघर्षात पुरुषाच्या बरोबरीने सहयोग देणारी वास्तव नायिका आहे.

६. जीवन स्वत:च्या मनाप्रमाणे जगण्याच्या तिच्या अधिकाराची पायमल्ली होताच खवळून उठून लढा देणारी लढवय्यी आहे.

७. धनाजी व आवडी दोघेही प्रेम, त्याग, धैर्य या उदात्त भावनांची मूर्त उदाहरणे वाटतात, समाजाला दोघेही सामाजिक समतेचा क्रांतिकारी संदेश प्रस्तुत कादंबरीतून देतात.

८. विशिष्ट सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने पडणारे अण्णाभाऊंचे पाऊल हे 'आवडी' या कादंबरीच्या रुपातच पडले असावे असे वाटते.

९. ग्रामीण भागातील समाजव्यवस्था, जीवन व्यवहार, उपेक्षा यांच्या विरुद्ध झगडताना, शोषणाविरुद्ध निकराने लढा देताना कादंबरीची नायिका आवडी दिसते.

१०. जबरदस्ती व दमननितीच्या विरोधात लढण्याची क्षमता असलेली माणसे त्यांनी पाहिली होती. त्यामुळे असे नायक-नायिका अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांमधून साकार झाले.

## ०९. संदर्भ :


१) साठे अण्णा भाऊ : 'आवडी', सुरेश एजन्सी, पाचवी आवृत्ती, १ ऑगस्ट १९९३, प्रस्तावना, पृष्ठ क्र.१.

२) वाघमारे जनार्दन : साहित्यचिंतन, लेख - अण्णा भाऊ साठे : एक विद्रोही वादळ, प्रतिभा प्रकाशन, आवृत्ती दुसरी १९९६, पृष्ठ क्र. १३३.

३) भोसले एस. एस. : अधिकउणे, लेखनवाचन प्रकाशन, आवृत्ती पहिली १९९०, लेख - अण्णाभाऊंच्या उपेक्षेमागील निष्ठा, पृष्ठ क्र. ६६.

४) रेड्डी तारा : ग्रंथ - जननायक अण्णा भाऊ साठे, लेख - अण्णाभाऊंच्या मनस्वी नायिका, पृष्ठ क्र.१३२)

५) पाटील दत्ता : अण्णाभाऊ साठे यांचे शाहिरी वाङ्मय, लेख - अण्णा भाऊ साठे आणि त्यांचे वाङ्मय, (अण्णाभाऊंची कादंबरी) पंचगंगा प्रकाशन, मार्च २०००, पृष्ठ क्र. ५१.

-----x-----